महाराष्ट्र जनशक्ती | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १२३ वा | दिनांक : ०७/०२/२०२५ | वार : शुक्रवार

## मंत्री पदावरील व्यक्तीवर न्यायालय ताशेरे ओढते हे धक्कादायक : आदित्य ठाकरे





**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा जपानच्या टोकियो येथे उभारण्यात येणार आहे. या पुतळ्याचे स्वागत आम्ही वरळी मुंबईमध्ये करू शकलो याचे भाग्य समजतो, अशी प्रतिक्रिया ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी दिली आहे. पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी अनेक विषयांवर भाष्य केले आहे. यावेळी त्यांनी धनंजय मुंडे आणि करुणा शर्मा यांच्या केसवर देखील प्रतिक्रिया दिली आहे.

मंत्री पदावर असलेल्या व्यक्तीवर अशा प्रकारे न्यायालय ताशेरे ओढले जातात हे धक्कादायक आहे, अशी प्रतिक्रिया देत आदित्य ठाकरे यांनी धनंजय मुंडे यांच्यावर टीका केली आहे. पुढे ते म्हणाले, राज्य सरकारकडून शिवभोजन थाळी बंद करण्यात येत असून लाडकी बहीण योजनेवरही निर्बंध घातले जात आहेत. त्याच अनुषंगाने, या योजनांवर ब्रेक लावण्यापेक्षा जे साथी त्यांच्यासोबत आहेत, जे भ्रष्टाचार करत आहेत त्यांना ब्रेक लावा, असे म्हणत आदित्य ठाकरेंनी नाव न घेता धनंजय मुंडेंना लक्ष्य केले.

वांद्रे कोर्टात धनंजय मुंडे आणि करुणा शर्मा यांच्यावर झालेल्या सुनावणीवर बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, हे धक्कादायक आहे, मंत्री पदावर असेल त्या व्यक्तीवर अशा प्रकारे न्यायालयाकडून ताशेरे ओढले जात आहेत. मुख्यमंत्र्यांच्या कानावर या कोणत्याही गोष्टी जात कशा नाहीत? असा सवाल देखील आदित्य ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांना विचारला आहे.

आदित्य ठाकरे मुंबईमधील घोटाळ्यावर बोलताना म्हणाले, मुंबईत रस्ता घोटाळा झाला आहे, हे मी आधीपासून सांगत आहे. पण, आयुक्तांनी तो एक्सपोज केला. एकनाथ शिंदे यांचा खोटरडेपणा त्यांनी समोर आणला. माझे चॅलेंज आहे, २६ टक्के रस्ते पूर्ण झाले आहेत, हे तुम्ही दाखवा. केवळ ५ टक्क्यांपेक्षा जास्त कुठेही रस्ते झाले नाहीत, असा दावा देखील आदित्य ठाकरे यांनी केला आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले, शिवभोजन आणि आनंदाचा शिधा यासंदर्भात १ लाख कोटींचे बिले अजून थकलेली आहेत. कंत्राटदारांनी एक दिवसाचा बंद पाळला पाहिजे. आर्थिक आणि राजकीय शिस्त सरकारने स्वतःला लावणे गरजेचे आहे. कॉन्ट्रॅक्टर्ससाठीची उधळपट्टी बंद करा. शिवभोजन थाळी आम्ही सुरू केली होती, कोरोनामध्ये मोफत जेवण मिळायचे. आनंदाचा शिधामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे, असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले. तसेच, बाकीचे काम करणाऱ्यांची बिले थकवायची आणि लाडक्या कॉन्ट्रॅक्टरची उधळपट्टी करायची, असे सरकारचे काम असल्याची टीका आदित्य ठाकरे यांनी केली आहे.

## धनंजय मुंडे मंत्रीपदावर राहणे योग्य नाही - विजय वडेट्टीवार



**मुंबई :** करुणा मुंडे यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्याविरोधात घरगुती हिंसाचार केल्याचा आरोप करत कौटुंबिक न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेतील आरोप न्यायालयाने मान्य केले आहे. तसेच करुणा मुंडे यांना दरमहा सव्वा लाख रुपये पोटगी देण्याचे आदेश दिले.

या प्रकरणावर मराठा आंदोलन मनोज जरांगे यांनी देखील प्रतिक्रिया दिली. करुणा शर्मा कुणाची तरी बहीण लेक आहे, त्यांना न्याय मिळालाच पाहिजे, असे मनोज जरांगे म्हणाले. तर धनंजय मुंडे मंत्रीपदावर राहणे योग्य नाही, अशी टीका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. याशिवाय ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे, तृप्ती देसाई, अंजली दमानिया यांनीही आपली प्रतिक्रिया दिली.

मंत्री धनंजय मुंडे यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. करुणा शर्मा-मुंडे यांनी धनंजय मुंडेंविरोधात दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाने धनंजय मुंडे यांच्यावरील आरोप मान्य केले आहेत. त्यामुळे करुणा शर्मा-मुंडे यांना पोटगी देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणात वाल्मिक कराड अटक झाल्यानंतर आता याप्रकरणामुळे धनंजय मुंडे यांच्यावरील दबाव आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

त्या निर्णयाचे स्वागत करतो. प्रतिष्ठित व्यक्तीने आणि संविधानिक पदावर असणाऱ्या व्यक्तीने असं वागणे योग्य नाही. त्या महिलेची भूमिका न्यायालयाने मान्य केली. याचा अर्थ विद्यमान मंत्र्यांनी कौटुंबिक हिंसा केली. जर दोन लाख पोटगी द्या म्हणते म्हणजे कौटुंबिक हिंसा झाल्याचे कोर्टाने मान्य केले आहे. तो व्यक्ती मंत्री पदावर राहणे योग्य नाही, अशी टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

करुणा मुंडेंबद्दल कोर्टाने दिलेला निर्णय हे अभिनंदनीय आहे. एका महिलेच्या आत्मसन्मानाचा लढा आहे. त्यांनी दिलेला लढा कोतुकास्पद आहे. फडणवीस यांना सगळे माहिती असताना तरी देखील कानावर हात ठेवून का आहेत? हा कळीचा मुद्दा आहे, असे शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या.

## कुणीही उठून मनाला वाटेल तसा महाराजांचा इतिहास सांगतो : युवराज संभाजीराजे

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिस्तीचे मोठेपण कळावे म्हणून हिरकणीची कथा रचली गेली आहे. गडाचे दरवाजे सूर्यास्ताला बंद व्हायचे वगैरे सांगत. हिरकणी घडलेलीच नाही. असे काहीही नाही. असा इतिहासच नाही. पण ते लिहिले गेले, असा दावा राहुल सोलापूरकर यांनी केला होता. तसेच महाराज आग्र्याहून सुटले ते मिठाईचे पेटारे वगैरे काही नव्हते. महाराज चक्क लाच देऊन आले आहेत, असेही त्यांनी म्हटले होते. यावरुन युवराज संभाजीराजे छत्रपती यांनी टीका केली आहे. इतकेच नाही तर यावर त्यांनी ठोस उपाय देखील सुचवले आहेत.

या संदर्भात शासनाने शिव चरित्राचे संशोधक, अभ्यासक व चिकित्सक यांची संशोधन समिती स्थापन करून भक्कम संदर्भांवर आधारित शासकीय चरित्रग्रंथ प्रकाशित करण्याची मागणी संभाजीराजेंनी केली आहे. त्यामुळे शासकीय चरित्रग्रंथ संदर्भ म्हणून वापरता येईल आणि इतिहासाविषयी वादंग उठणार नाही, अशी आशा देखील त्यांनी व्यक्त केली आहे. या संदर्भात त्यांनी एका पोस्टच्या माध्यमातून शासनाकडे ही मागणी केली आहे.

हल्ली कुणीही उठून आपापल्या आकलनानुसार छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास मनाला वाटेल तसा सांगत आहे. इतिहासाची प्रतारणा होईल, लोकभावनेस ठेच लागेल, कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होतील, याचे कुणालाही भान राहिलेले नाही. यावर ठोस उपाय म्हणून महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या समग्र इतिहासावर परिपूर्ण शासकीय ग्रंथ प्रकाशित करावा.

शासनाने शिवचरित्राचे संशोधक, अभ्यासक व चिकित्सक यांची संशोधन समिती स्थापन करून भक्कम संदर्भांवर आधारित शासकीय चरित्रग्रंथ प्रकाशित करावा, जेणेकरून शिव चरित्रावरील व्याख्याने, मालिका, नाटक, चित्रपट आदी सर्व साहित्यांस हा शासकीय चरित्रग्रंथ संदर्भ म्हणून वापरता येईल आणि इतिहासाविषयी वादंग उठणार नाही. याविषयी शासनाने तत्काळ कार्यवाही करावी. मी या चरित्र ग्रंथाच्या निर्मितीची संपूर्ण जबाबदारी घेण्यास तयार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिस्तीचे मोठेपण कळावे म्हणून हिरकणीची कथा रचली गेली आहे. गडाचे दरवाजे सूर्यास्ताला बंद व्हायचे वगैरे सांगत. हिरकणी घडलेलीच नाही. असे काहीही नाही. असा इतिहासच नाही. पण ते लिहिले गेले, असा दावा राहुल सोलापूरकर यांनी केला होता.

महाराज आग्र्याहून सुटले ते मिठाईचे पेटारे वगैरे काही नव्हते. महाराज चक्क लाच देऊन आले आहेत. त्यासाठी किती हुंड्या सोडवल्या याचे पुरावे आहेत. औरंगजेबाच्या वजीराला आणि त्याच्या बायकोलाही लाच दिली गेली. मौसिन खान किंवा मोईन खान नाव आहे त्याचे. त्याचे परवाने घेऊन सगळे बाहेर पडले होते. स्वामी परमानंद शेवटचे पाच हत्ती घेऊन गेले त्याच्या परवान्याची खूणही आहे अजूनही. गोष्टी रुपात करताना ते रंजक करुन सांगितलं गेले आहे. त्यामुळे खरा इतिहास लोकांसमोर जात नाही, असाही दावा राहुल सोलापूरकर यांनी केला होता.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०७ फेब्रुवारी २०२५


## हॉलीबॉल खेळाडूंच्या कामगिरीबद्दल माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने सत्कार व आनंदोत्सव....



**मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी येथे विजेत्या खेळाडूंचा द्वितीय क्रमांकाची ट्रॉफी देऊन सत्कार करताना मान्यवर व अन्य.**

**मुरूम, ता. उमरगा, ता. ६ (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या खेळाडूंचा बक्षीस वितरण सोहळा मंगळवारी ( ता. ५ ) रोजी करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे होते.

यावेळी प्रमुख अतिथी सेवानिवृत्त क्रीडा प्रमुख प्रा. डॉ. भिलसिंग जाधव, प्रा. डॉ. रवींद्र आळंगे, प्रा. डॉ. महेश मोटे, डॉ. रवींद्र गायकवाड, डॉ. राम बजगिरे, प्रा. गोपाळ कुलकर्णी, डॉ. सुधीर पंचगल्ले, डॉ. अप्पासाहेब सूर्यवंशी, डॉ. सुजित मठकरी आदींची प्रमुख उपस्थिती होती. आलमला, ता. औसा येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये दहाव्या राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा नुकत्याच पार पडल्या. या स्पर्धेमध्ये माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीच्या संघाने राज्यस्तरीय द्वितीय पारितोषिक मिळवत सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख १५ हजार रुपये पटकाविले.

या संघाचा कर्णधार नजीर जेवळे, माधव बिराजदार, शुभम सुरवसे, मयूर गायकवाड, संग्राम आसबे, प्रतीक राठोड, इम्रान पटेल, नबीलाल जमादार, मयूर चोथवे आदी खेळाडूंनी सर्वोत्कृष्ट कामगिरी करून विजय मिळविला.

या योगदानाबद्दल सर्व खेळाडूंचे महाविद्यालयाच्या वतीने सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र, ग्रंथ भेट, फेटा बांधून व पुष्पहार घालून मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सदर खेळाडूंना प्रा. राहुल इंजे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. सुदीप ढंगे, प्रा. पायल आगरकर, प्रा. वैष्णवी पाटील, प्रा. राजनंदिनी लिमये, प्रा. प्रियंका काजळे, प्रा. सदफअलमास मुजावर, प्रा. अनिल मोरे, प्रा. लखन पवार, मल्लू स्वामी, अमोल कटके, किशोर कारभारी आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रवींद्र आळंगे यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा. विनंती बसवंतबागडे तर आभार प्रा. विवेकानंद चौधरी यांनी केले. याप्रसंगी विजेत्या खेळाडूंनी जल्लोष पूर्ण वातावरणात डीजेच्या तालावर आतिषबाजी करत आनंदोत्सव साजरा केला. यावेळी बहुसंख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## प्रा.डॉ भागवत सुखदेव परकाळ यांची अहिल्यानगर जिल्हा समन्वयक(शहर) पदी नियुक्ती



**अहमदनगर :** अहमदनगर महाविद्यालय अहिल्यानगर येथे कार्यरत असणारे महाविद्यालयीन करिअर कट्टा समन्वयक प्रा.डॉ. भागवत परकाळ यांची जिल्हा समन्वयक पदी नियुक्ती करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व तंत्र विभाग व महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करियर कट्टा हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहे तसाच तो महाविद्यालयात कार्यरत असून युवकांचा सर्वांगीण विकासासाठी हे ब्रिद वाक्य घेऊन करिअर कट्टा काम करतो.

विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा संबंधी माहिती देणे, विद्यार्थ्यांचा कौशल्य विकाससाठी मदत करणे, आर्थिक साक्षरते बद्दल माहिती देणे, त्यांच्यातील नेतृत्व क्षमता विकसित करणे या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी करिअर कट्टा कटिबद्ध असतो .गेल्या वर्षभरात मदाविद्यालय स्तरावर करियर कट्टा मध्ये विद्यार्थी नोंदणीसाठी केलेले प्रयत्न ,महाविद्यालयाचा उपक्रमातील सहभाग आर्थिक साक्षरता, करिअर संसद, सेंटर ऑफ एक्सीलेन्स, पोलीस भरती व इतर उपक्रम, उपलब्ध करून दिलेली साधनसामग्री.

आत्तापर्यंत मिळालेले यश आणि विविध उपक्रमांची वेळेत केलेली कार्य पूर्तता या पातळ्यांवर त्यांनी उत्कृष्ट कार्य केल्या बद्दल त्यांची २०२५ ते २०३० या ५ वर्षासाठी अहिल्यानगर (शहर )जिल्हा समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

त्यांच्या या यशा बद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आर. जे. बार्नबस, उपप्राचार्य प्रा दिलिपकुमार भालसिंग, कायम विनाअनुदान विभागाचे समन्वयक प्रा .डॉ सय्यद रज्जाक, उपप्राचार्य प्रा .डॉ .नोएल पारगे, उपप्राचार्य प्रो .डॉ प्रतिमकुमार बेदरकर महविद्यालयाचे प्रबंधक श्री पीटर चक्रनारायण तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू भगिनी आणि शिक्षकेतर कर्मचारी बंधु व भगिनींनी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

आदरणीय श्री यशवंत शितोळे अध्यक्ष , महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र कोल्हापूर यांनी त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी त्यांना प्रा.नवनाथ विठोबा नागरे जिल्हा समन्वयक अहिल्यानगर आणि डॉ. दीनानाथ देवराम पाटील, पुणे विभागीय प्राचार्य प्रवर्तक संतुकराव थोरात महाविद्यालय संगमनेर व प्रा.विलास सुद्रिक, जिल्हा समन्वयक, अहिल्यानगर (शहर) प्राचार्य प्रवर्तक डॉ.सतीशचंद्र सुर्यवंशी छत्रपती शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा मोलाचे मागदर्शन लाभले.

## सलग चौथ्या दिवशी सोने ऑल टाइम हाय



**नवी दिल्ली :** सोन्याने आज म्हणजेच गुरुवारी (६ फेब्रुवारी) सलग चौथ्या दिवशी सर्वकालीन उच्चांक गाठला. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन (IBJA) नुसार, २४ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमची किंमत १५ रुपयांनी वाढून ८४,६७२ रुपये झाली आहे. त्याआधी, काल म्हणजेच ४ फेब्रुवारी रोजी सोन्याचा दर ८३,६५७ रुपये प्रति दहा ग्रॅम या सर्वोच्च पातळीवर होता.

आज चांदीच्या किमतीत घसरण झाली आहे. १ किलो चांदीचा भाव कालच्या किमतीपेक्षा १३३ रुपयांनी घसरून ९५,२९२ रुपये प्रति किलो झाला. काल चांदीचा भाव ९५,४२५ रुपये प्रति किलो होता. २३ ऑक्टोबर २०२४ रोजी चांदीचा दर ९९,१५१ रुपये प्रति किलोवर पोहोचला होता आणि तो आतापर्यंतचा उच्चांक होता.

## स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल बाजार सावंगी च्या संस्थाचालकाने मागितली जाहीर माफी महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचा दणका..



**छत्रपती संभाजी नगर :** २६ जानेवारी २०२५ रोजी स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल बाजार सावंगी या शाळेत अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि संविधान निर्माते बोधिसत्व महामानव डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा जाणीवपूर्वक न लावल्यामुळे बाजार सावंगी गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

तात्काळ महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते व गावकऱ्यांनी ही घटना पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी. वडमारे व जिल्हा संघटक रतन जाधव यांना कळविल्यानंतर त्या घटनेची व्हिडिओ रेकॉर्डिंग व फोटो जमा केले आणि शिक्षणाधिकारी यांना तात्काळ तक्रार दिली त्यानंतर सर्व महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे पदाधिकारी स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल बाजार सावंगी येथे गेले तेथे संस्थाचालक साळुंखे व बाकी शिक्षक असताना त्यांना जाब विचारण्यात आला की अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि ज्यांनी २६ जानेवारी रोजी भारताला संविधान बहाल केले ते संविधान निर्माते महामानव बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा न लावताच तुम्ही कसे काय कार्यक्रम घेता असे विचारणा केली असता बराच वेळ ही घटना चालू असताना सर्व पदाधिकाऱ्यांनी आग्रह धरला की तुम्ही जाहीर जनतेची माफी मागावी म्हणून बाजार सावंगी गावातील चौकात येऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला साक्षी धरून संस्थाचालकांनी जाहीर माफी मागितली व दिलगिरी व्यक्त केली आणि याच्यापुढे शाळेत अशी कोणतीच घटना घडणार नाही याची सर्व साक्षी ग्वाही दिली..यावेळी प्रमुख उपस्थिती जिल्हाध्यक्ष -राहुल जी. वाडमारेजिल्हा संघटक- रतन जाधव जिल्हा सचिव -बापूसाहेब चाबुकस्वार जिल्हा उपाध्यक्ष- संजय चव्हाण अपंग आघाडी जिल्हाध्यक्ष- संजय बनकररतन धनेधर, विठ्ठल खरात, भगवान धनेधर ,प्रवीण गायकवाड, राहुल धनेधर, अमोल धनेधर.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०७ फेब्रुवारी २०२५

## डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा कार्यक्रम



**छत्रपती संभाजीनगर:** डॉ.सौ.इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात वर्ग १२ वीच्या विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेच्या अनुषंगाने शुभेच्छा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुनीता बाजपाई मॅडम होत्या. तसेच कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रभारी पर्यवेक्षिका प्रा.डॉ.शोभा हनवते आणि परीक्षा समिती प्रमुख डॉ.प्रभाकर गायकवाड, प्रा . रविंद्र परभाने, प्रा.ज्योत्स्ना लचुरे, आदींची उपस्थित होती.

या प्रसंगी प्रा. रविंद्र परभाणे यांनी विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसंदर्भातील महत्त्वपूर्ण सूचना तसेच मार्गदर्शन केले.तसेच भविष्यातील करिअर मार्गदर्शन विषयक मार्गदर्शन देखील केले.याप्रसंगी सराव परीक्षेतून प्रथम, द्वितीय, तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

अनुक्रमे वाणिज्य विभाग :१. किरण कळकुंबे २. तेजल अग्रवाल, ३. अदनान सय्यद HSVC विभाग :१. रिया हजोंग,२. पूजा गाडेकर, ३. लोकेश भावसार, विज्ञान विभाग :१. सानिया बागवान,२. सोनाली रोकडे, ३. राधा बादशाह, कला विभाग :१. भार्गवी मोदी, २. उन्नती उमरकर, ३. अमृता गायके आणि श्रुती गुट्टे तसेच या प्रसंगी राधिका दैठणकर, अमृता गायके, भार्गवी मोदी, अर्पिता कदम, राखी चिरोटे, उन्नती उमरकर, लक्ष्मी सारंग, वृषाली खांड्रे, गणेश कोरडे, हर्षराज परसोडे या विद्यार्थ्यांनी महाविद्यालया विषयी असणारे भावना, प्रेम आपल्या मनोगताद्वारे व्यक्त केले .

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.शरद देशमुख यांनी केले तर अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी विद्यार्थिनींना महाविद्यालय कोणीही सोडून जात नाहीये पुढील शिक्षणासाठी आम्ही सर्व इथेच आहोत फक्त शिक्षक बदलतील , विषय अजून दीर्घ स्वरूपात शिकण्यास मिळतील असे प्रतिपादन केले. संस्थेने पदवी स्तरावरील शिक्षणाची दर्जेदार सोय केली आहे. उत्कृष्ट ग्रंथालय, वसतीगृह, खेळ, प्रयोगशाळा आदी भोतिक व पायाभूत सुविधांनी युक्त सुसज्जित इमारत तसेच बीसीए, ब्युटी पार्लर, फॅशन डिझाईनिंगला प्रवेश घेता येईल. असे सांगून सर्व विद्यार्थ्यांना बारावी परीक्षेत घवघवीत यश संपादन करावे अशा शब्दात शुभेच्छा दिल्या.

तसेच कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन डॉ. प्रभाकर गायकवाड यांनी केले..या कार्यक्रमाप्रसंगी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले.

## डॉ.सौ. इं.भा.पा. महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींची क्षेत्रभेट

**छत्रपती संभाजीनगर:** येथील डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयातील बीसीए विभागातर्फे ऋचा इंजिनियर्स प्रा. लि. कंपनीस क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले.विद्यार्थिनींना याद्वारे कंपनीचे कामकाज व्यवस्थापन आणि कंपनीतील वापरण्यात आलेली सॉफ्टवेअर ची माहिती देण्यात आली.

कंपनीतील उत्पादन तसेच तांत्रिक प्रक्रिया याविषयी उपयुक्त माहिती कंपनीतील श्री अनिल सोनवणे व त्यांचे सहकारी यांनी विद्यार्थिनींना दिली.

या क्षेत्र भेटीसाठी प्रभारी प्राचार्य डॉक्टर सुनीता बाजपाई यांचे मोलाचे सहकार्य लाभले. एकूण ७५ विद्यार्थीनी तसेच विभाग प्रमुख प्रा. उमाळकर प्रा. दीक्षित प्रा. मुत्याल प्रा. ठाकूर यांचा सहभाग होता.

## कन्नड प्रहार दिव्यांग संघटनेचे छ. संभाजीनगर येथे पिंडदान आंदोलन करण्यात येणार




**कन्नड (राहुल थेटे) :** कन्नड तालुक्यातील त्र्यंबक कडबा धोत्रे या दिव्यांग बांधवांनी पैठण जायकवाडी धरणात आत्महत्या केली त्या अनुसरून दिनांक ०८/०२/२०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर इथे पिंडदान आंदोलन करण्यात येणार आहे.

या सरकारचं श्रद्ध घालायचे आहे यासाठी आपल्या कन्नड तालुक्यातील घटना आहे त्यामुळे कन्नड तालुक्यामधून कमीत कमी हजार दिव्यांग बांधव या आंदोलनला सहभाग घेणे फार गरजेचे आहे.

कन्नड तालुक्यामधील सर्व दिवंग्यांनी पिंडदान आंदोलनला एकजुटीने संभाजीनगर येथे हजर राहायचं आहे या आंदोलनाची जबाबदारी अन्वर पठाण, गणेश सपकाळ, सोमनाथ चोंधे, अंतराम नलावडे, कारभारी रणमाळे, शेषराव ठाकरे, संजय मिसाळ, अबूबकर, गोपाल परदेशी, सागर करणखेडा, विलास निकम, मोहम्मद शेख, तेजस सात दिवे, असलम पठाण शेख, गणेश जाधव, अमोल बनकर, भगवान कदम, रामहरी घुगे, प्रल्हाद नांगरे, सुरेश वाघ, बाबासाहेब मुगले, दनके, मास्तर नेव पूर, इत्यादी प्रहार पदाधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी पार पाडविणे सर्वात जास्त संख्येने या आंदोलनामध्ये सहभागी होणार व्हायचे आहे कमीत कमी १०० दिव्यांग बांधव एका पदाधिकारींना आणावी फक्त एकच वार जय प्रहार!




## हेल्मेट नसल्यास एक हजार रुपये दंड महामार्गावर हेल्मेट सक्ती




**कन्नड (राहुल थेटे) :** दुचाकी अपघातात मृत्यू रोखण्यासाठी ३ फेब्रुवारी २०२५ सोमवारपासून राष्ट्रीय महामार्गावर हेल्मेट सक्ती करण्यात आली आहे.

दुचाकी चालक व मागे बसणारा अशा दोघांसाठी ही हेल्मेट सक्ती करण्यात आली असून, चार वर्षावरील प्रत्येकाने महामार्गावर हेल्मेट परिधान करणे बंधनकारक राहणार आहे.हेल्मेट नसल्यास जागेवरच एक हजार रुपये दंड होणार आहे.

१ जानेवारी २०२५ शनिवारपासून राष्ट्रीय महामार्गावर हेल्मेट सक्ती करण्याविषयी आदेश काढण्यात आले. यामध्ये दुचाकीस्वारांना सवय लागणार यासाठी महिनाभर कडक कारवाईची भूमिका पोलिसांनी घेतली नव्हती, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक राहुल गायकवाड यांनी असून शहरात हेल्मेट सक्ती नसली तरी शहरातून जाणाऱ्या महामार्गावर, महामार्गावरील तसेच चौकांमध्ये हेल्मेट सक्ती राहणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०७ फेब्रुवारी २०२५


# रमाई जयंती विशेष

"गरिबी जरी त्या संसारात होती, रमाची भीमाला तरी साथ होती. भीमराव होते दिव्याच्या समान आणि त्या दिव्याची रमा वात होती. त्यागमुर्ती, कारुण्याची झरा, कोटी कोटी जगाची माऊली रमाई भीमराव आंबेडकर यांच्या पवित्र स्मृतीस कोटी कोटी वंदन"भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 'भीमाचे' बाबासाहेब बनवण्यात महत्वपुर्ण वाटा उचलणा–या व्यक्तिमत्व म्हणजे बाबासाहेबांच्या पत्नी रमाबाई भीमराव आंबेडकर.

आज ०७ फेब्रुवारी जयंतीनिमित्त रमाबाई आंबेडकर यांना विनम्र अभिवादन... रमाई म्हणजे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची सावली आहे. बाबासाहेब शिक्षण घेत असताना रमाईनीं अत्यंत हलाखीच्या परिस्थीतीत संसार सांभाळला. पददलितांच्या आई रमाई यांनी शोषलेल्या गरिबीच्या चटक्यांचा, वेळ प्रसंगी आपल्या इच्छा अपेक्षांच्या दिलेल्या आहुतीला आजिबात विसरता येणार नाही.

रमाईचा जन्म ०७ फेब्रुवारी १८९८ रोजी दापोली जिल्ह्यातील वनंदगाव या छोट्याशा खेडेगावामध्ये झाला. रमाई ह्या अगदी लहानपणापासून खुप समजदार, प्रेमळ, आणि घर कामामध्ये खुप हुशार होत्या. रमाई अवघ्या ०९ वर्षाच्या असताना भीमरावांशी विवाह झाला. आणि आपण असे म्हणतो की, एकप्रकारे प्रत्येक यशस्वी पुरुषामध्ये एका महिलेचा हात असतो. मग ती आई किंवा पत्नी देखील असु शकते. रमाई ही उत्कृष्ठ गृहिणी तसेच सुसंस्कारीत समाज निर्माण करणारी माता देखील होती. डॉ.बाबासाहेबाच्या वैवाहिक जीवनात रमाईने खुप हाल अपेष्ठा, दु:ख आणि गरिबी यावर मात केलेली आहे. कष्ट, त्याग, संघर्ष, मातृत्व, प्रेम, आदर आणि सामंजस्य म्हणजेच एक आदर्श-- रमाई...रमाई म्हणजे- त्याग - महामाता रमाई यांनी जीवनात सोसलेल्या खडतर काटेरी वाटावर फुले केवळ पसरवू शकल्या. दुसरं कुणीही उभ्या आयुष्यात करु शकले नसते.

भीमरावांना प्रकांड पंडित विद्वतेचा महामे डिग्री बनविण्याचे निस्सीम अथक प्रयत्न आणि त्याग हा संसाराचा गाढा रमाईने ओढला नसता तर माझे भीमराव शिकले नसते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर झाले नसते. आपल्या सर्वाचा उद्धारकर्ता तुम्हा आम्हाचा मार्गदाता, मागासलेल्या, उपेक्षित शोषित, दारिद्रयामध्ये सडलेल्या समाजाला कदापी न्याय मिळाला नसता. हे आपण सर्वानी रमाईला नतमस्तक होऊनच मान्य करावे लागेल. अगदी लहान वयात सर्व काही रमाईने सोसले. म्हणजेच रमाई माऊलीने मेहनत पराकाष्ठा करुन आपल संसार उभा केला.

मोलमजुरी करुन शेणाच्या गोव–या थापुन मुलांचा संभाळ केला हे आपण पाहतो.आजच्या २१ व्या शतकातील मातानो, भगिनींनो रमाई सारख्या महान कर्तत्वान मातेकडुन धाडसाचे जिद्दीचे जिवंत मुर्तीमंत उदाहरण घ्या. आत्मविश्वास व मनाचा कठोरपणा घ्या. त्या काळात रमाई काय- काय करु शकल्या? आज आपण काय काय करतो? याचे डोळस विचार करायला पाहिजे. आभाळाचे ढग जसे दाटुन आल्यानंतर गडगडाट होतो. अंधारात जशा विजा चमकतात, क्षणार्धात त्या अंगावर धावुन येत आहेत. असे माऊली रमाईला वाटत असेल.

एकंदरीत रमाईने दृढ निश्चय केलेला होता. वास्तवीक रमाईचे जीवन हे उच्च आदर्शानी ओतप्रोत भरलेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आयुष्यातला अमुल्य वेळ समाजोपयोगी, देशोपयोगी व सत्कर्मी खर्च व्हावा. म्हणून रमाई स्वत:ला विसरुन अस्पृश्यतेला नेहमी लढा देत असत. म्हणजे रमाई जीवनभर दु:खात होरपळत राहिल्या. पण दु:खात ही बाबासाहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहील्या.दु:खात ही माणसे मोठी होतात. हे रमाई ने जाणले. शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी असे संत तुकारामांनी म्हटले होते. म्हणून रमाई ह्या अगदी गरीब कुटूंबातील असुन त्या महान त्यागाच्या व कारुण्याच्या वैभवाने कोट्यवधी लोकांच्या काळजात आई म्हणून कोरल्या गेल्या. आज अनेक महिलांनी रमाईचा आदर्श डोळ्यापुढे ठेऊन नोकरी करता करता आपल्या संसाराला सुद्धा मेहनत करुन सांभाळ केला पाहिजे व स्वत: शिक्षण घेउन आपल्या मुलांबाळाचे भवितव्य शिक्षणाच्या मार्गाने उन्नतीकडे नेण्याचा प्रयत्न केला पहिजे.

आज आपल्या भारत देशात अनेक महिला उच्च पदावर विराजमान आहेत. त्यांनी सुद्धा शिक्षण घेऊन आपली वाटचाल प्रगतीच्या वाटेकडे नेहलेली आहे. पण हे सर्व करत असताना आपले कुटूंब आणि संसार ह्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. आणि आपल्या कुटूंबाच्या उन्नतीसाठी प्रत्येक महिलांचे पहिले कर्तव्ये असले पाहिजे.स्त्रीवाद म्हणजे काय?

स्त्रीवाद ही संकल्पना १९६० नंतरच्या दशकात आलेली विचारप्रणाली आहे. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रियांना मिळालेल्या दुय्यम स्थानाचा प्रतिवाद करणे आणि सामाजिक, राजकीय आणि आर्थिक सत्तास्थानात पुरुषांच्या बरोबरीने स्थान प्राप्त होण्यासाठी डावपेच आखणे हे स्त्रीवादी चळवळीचे स्वरुप आहे. स्त्रीवाद समजुन घेण्यासाठी स्त्रीचे समाजातील दुय्यम स्थान समजुन घेणे महत्वाचे आहे. स्त्रीकडे एक व्यक्ती म्हणुन पाहण्यापेक्षा तिच्याकडे बाई म्हणून पाहिले जाते. मग स्त्रीवाद म्हणजे काय? याबाबत डॉ.नागनाथ कोत्तापले म्हणतात कि, स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला आपल्या स्व:त्वाची जाणीव होणे. तिला आपल्या व्यक्तीमत्वाचा अर्थ कळणे, समान हक्क, समान संधी, समान दर्जा आणि समान स्वातंत्र्य हा स्त्रीवादाचा गाभा आहे.

स्त्रीवादाने स्त्री-पुरुष अशा भेदभावाला कठोर विरोध केलेला आहे. पुरुषाच्या बरोबरीने स्त्रीला जीवनाच्या सर्वच क्षेत्रात समान दर्जाने वागविले पाहिजे. तिला रोजगाराच्या समान संधी मिळाल्या पाहिजे. केवळ स्त्री म्हणुन डावलले जावू नये. स्त्री असल्यामुळे तिचे हक्क, अधिकार डावलले जातात. याचा विरोध करणा–या विचारधारेला स्त्रीवादी विचारधारा असे म्हणतात.रमाई म्हणजे त्यागमुर्ती, त्याच्या अतुल्य त्यागाला पारावार राहिलेला नाही. म्हणुन रमाई विषयी मला चारोळी आठवते...माझी रमाई ना कधी खचली, माझी रमाई ना कधी हरली, पतीच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटली, त्याग करुनी सर्व सुखाच्या परिस्थितीशी झुंजली, अशी दीन दुबळ्यांची मात रमाई थोर झाली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला आजन्म वाहुन घेणा–या या त्यागी रमाई मुळेच आज भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर ठरले. आणि त्यांच्यामुळेच आज प्रत्येक महिला उच्च पदावर शिक्षणामुळे कार्यरत आहेत. तसेच आजची स्त्री ही प्रत्येक क्षेत्रात बाबासाहेबांमुळे प्रगत व प्रबळ आहे. त्यामुळे त्याचे सर्व श्रेय हे माता रमाईला द्यावे लागेल. त्यांचा हा त्याग आज देशातील सर्व बहुजन समाजातील स्त्रियांन मोलाचा ठरला आहे. अशा नवकोटी जनांची माता रमाई डॉ.बाबासाहेबांच्य मायेच्या सावली रमाई यांना वंदन करुन सर्वांनी स्वाभिमानाने, अभिमानाने रममय, भिममय आणि बुद्धमय होऊ या. अशा या महान कर्तत्वास शेवटी जयंती निमित्त पुनश्च वंदन आणि अभिवादनजय भिम / जय भिम / जय भिम /


**डॉ.किशोर नरहरी काळे,**

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,करमाड, ता.जि.छत्रपती संभाजीनगरमो.नं.9021228084



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


# मुंबई वाचवण्यासाठी शिवसेना तयार : उद्धव ठाकरे

**मुंबई** : महानगरपालिकेचा अर्थसंकल्प मंगळवारी सादर करण्यात आला होता. त्यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने हालचालींना वेग दिला आहे. काहीजण मुंबई लुटायला आले आहेत. पण मुंबई वाचवण्यासाठी शिवसेना तयार आहे. आपला वार्ड आणि संघटना मजबूत करा, अशा सूचना उद्धव ठाकरे यांनी शाखा प्रमुख व विभाग प्रमुखांना दिल्या आहेत. उद्धव ठाकरे यांनी मिशन मुंबई महानगरपालिका सुरू केल्याचे दिसत आहे.

विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव झाल्यानंतर आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीमधील सर्वच घटक पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली असल्याचे दिसत आहे. काही दिवसांपूर्वी ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी आगामी महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणूक स्वबळावर लढणार असल्याची घोषणा केली होती. त्यानंतर आता उद्धव ठाकरे यांनी देखील शाखा प्रमुख आणि उपविभाग प्रमुखांशी ऑनलाईन पद्धतीने संवाद साधला आहे.

उद्धव ठाकरे यांनी शाखा प्रमुख आणि उपविभाग प्रमुखांशी ऑनलाईन पद्धतीने संवाद साधत त्यांना मार्गदर्शन केले आहे. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, काहीजण मुंबई लुटायला आले आहेत. पण मुंबई वाचवण्यासाठी शिवसेना तयार आहे. आपला वार्ड आणि संघटना मजबूत करा. तुम्हाला अजून देखील अनेक आमिष येतील, त्याला बळी पडू नका, भक्कमतेने लढा.

मुंबई महानगरपालिका ही देशातील सर्वात मोठी व श्रीमंत महानगरपालिका समजली जाते. त्यामुळे मुंबई महापालिकेची निवडणूक सर्वार्थाने महत्त्वाची आहे. यानुसार आता ७ तारखेपासून ठाकरे गटाचे शाखा सर्वेक्षण होणार आहे. मुंबईतील प्रत्येक शाखेला एक निरीक्षक नेमला जाणार असून हा निरीक्षक शाखेत जाऊन पदाधिकारी आणि गटप्रमुख यांच्याकडून आढावा घेणार आहे. मुंबईतील प्रत्येक शाखेला एक निरीक्षक नेमण्यात येणार आहे. हे निरीक्षक मुंबईत प्रत्येक शाखेत जाऊन आढावा घेतील. त्याच सोबतच निरीक्षक शाखा बांधणीचा आढावा देखील घेणार आहेत. शाखेचे पदाधिकारी आहेत की नाहीत, कोणती आणि किती पदे रिक्त आहेत, याचा अहवाल हे निरीक्षक शिवसेना भवन येथे सादर करणार आहेत.